45

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** एस बी जालना
**Year (वर्ष):** 2024
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0107
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**05/02/2024 23:34

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 05/02/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/02/2024
**Time From (वेळेपासून):** 14:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:00 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 05/02/2024 **Time (वेळ):** 23:13 बजे
**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 054
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/02/2024 23:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** **Beat No. (बिट क्र.):**
पूर्व, 3 किमी
**(b) Address (पत्ता):** ग्रामीण शाखा, सहाय्यक अभियंता,कार्यालय, मराविविकंमर्या, कन्हैय्यानगर, ता जि जालना,समोर रोडवर चहाचे टपरीजवळ

**(c)In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a)Name (नाव):** श्री. शरद सुधाकर बावणे
**(b)Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1995
**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | घाणेवाडी, ताजि जालना,एस बी जालना ,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | घाणेवाडी, ताजि जालना,एस बी जालना ,जालना,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**
**(j) Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9823591464

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. गणेशसिंग बबनसिंग बायस | | | 1. कनिष्ठ अभियंता मानदेवूळगाव से, अति कार्यभार ग्रामीण शाखा का, क्र 3, मराविविकमर्या , जालना,एस बी जालना ,जालना, महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री. विष्णू धोंडीबा दांडगे | | | 1. लाईन हेल्पर, कंत्राटी, ,, ग्रामीण शाखा कार्यालय क्र 3, मराविविकमर्या कन्हैय्यानगर, जालना ,एस बी जालना , जालना,महाराष्ट्र,भारत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | श्री. भूषण अशोक वैजकर | | | 1 लाईन हेल्पर, कंत्राटी, R-3 यु, ग्रामीण शाखा, सहाय्यक अभियंता ,कार्यालय, मराविविकंमर्या,,कन्हैय्यानगर, ता जि जालना, ,एस बी जालना ,जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

ला.प्र.वि.कार्यालय जालना

दिनांक:-05/02/2024.

मी शरद सुधाकर बावणे, वय 29 वर्षे, व्यवसाय हॉटेल चालक, रा. घाणेवाडी, ता.जि. जालना मो.क्र. 9823591464.

मी आज दिनांक 05/02/2024 रोजी श्री. अमोल धस, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचे समक्ष भोकरदन नाका, जालना येथे सुरक्षीत ठिकाणी पंचासमक्ष तक्रार दिली की, " मी वरील ठिकाणचा रहिवाशी असुन माझे आईचे नावे हॉटेल समृध्दी बिअरबार व परमीट रूम हे जालना - राजूर रोडवर गुंडेवाडी फाटा येथे आहे. सदरचे हॉटेल मे 2023 पासून सुरू केलले आहे. त्याचे कामकाज मी स्वत: बघतो. मी माझे हॉटेलला माझे शेतीचे लाईट कनेक्शनमधून लाईट घेतलेली आहे. सदर हॉटेलकरीता व्यवसाईक विदयुत कनेक्शन घेण्याकरीता माझे वडील श्री. सुधाकर बावणे यांनी सहा महिण्यांपुर्वी MSEB ग्रामीण शाखा, कन्हैय्यानगर जालना येथे जावून श्री. विष्णू दांडगे यांची भेट घेतली असता त्यांनी पाच हजार रूपयांची मागणी केली होती. वडीलांनी पैसे देण्यास नकार दिलेने त्यांनी कोटेशन मिळणार नाही तुम्ही आमचे साहेबांना भेटून घ्या असे सांगितलेने वडीलांनी भेटण्याचा प्रयत्न केला परंतु कोणी न भेटल्याने वडील परतआले.

दिनांक 30/01/2024 रोजी श्री. बायस साहेब त्यांचेसोबत श्री. विष्णू दांडगे असे माझे समृध्दी बिअरबार व परमीट रूम हॉटेलवर आले व त्यांनी मला तुम्ही अनधिकृतपणे लाईट वापरत आहात असे म्हणून श्री. बायस साहेब व श्री. विष्णू दांडगे यांनी मला बाजुला घेवुन सेटलमेंट करून घ्या नाहीतर तुमच्यावर विजचोरीचा गुन्हा दाखल करू असे म्हणाल्याने मी त्यांना काहीतरी मार्ग सांगा असे म्हणालो असता त्यांनी मला 50 हजार रूपये दिले तर जागेवर सेटलमेंट करू असे सांगितले. मी त्यांना मला तीन चार दिवस वेळ दया असे सांगितले व ते निघून गेले. दिनांक 03/02/2024 रोजी मी त्यं○ाना भेटायला कधी येवू असे विचारले असता त्यांनी मला दिनांक 05/02/2024 रोजी सकाळी फोन करा असे सांगितलेआहे. त्यावेळी मला कळुन चुकले की, श्री. बायस व श्री. दांडगे हे मागत असलेले पैसे हे लाचेचेच आहेत मला त्यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी आपणाकडे तक्रार देत आहे. माझी श्री. बायस व श्री. दांडगे यांचेशी पुर्वदुश्मनी किंवा देणे-घेणेचा अथवा उसनवारीचा व्यवहार नाही. मला श्री. बायस व श्री. दांडगे भेटण्यासाठी बोलावणार आहेत. ते बोलावतील त्या ठिकाणी भेटायला मी जाणार आहे. श्री.

बायस व श्री. दांडगे यांची भेट घेऊन माझे कामासंदर्भात चर्चा करणार आहे. त्यावेळी श्री. बायस व श्री. दांडगे यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी. मी माझे आधार कार्ड झेरॉक्सप्रत व हॉटेलचे कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती आपणाकडे हजर करीत आहे.
माझी तक्रार माझे सांगणेप्रमाणे लॅपटॉपवर टकलिखीत केली असुन, प्रिंट काढल्यानंतर वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे." वगैरे मजकुराची तक्रार दिली. तसेच माझ्याकडे पंचवीस हजार रूपयाच्या चलनी नोटा असून त्यापेक्षा जास्त पैसे नसल्याने श्री. बायस व श्री. दांडगे यांनी त्यापेक्षा जास्त पैसे मागितल्यास सापळा कारवाईसाठी खेळण्यातील नोटांचा वापर करावा असे सांगितले व त्या नोटा मी उपलब्ध करतो असे सांगितले.
पोनि/घस यांनी माझे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 05/02/2024 रोजी श्री. बायस व श्री. दांडगे हे माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत मला व पंच क्रमांक 1 श्री. डोंगरे यांना श्री. बायस व श्री. दांडगे यांचेकडे ते बोलावतील तेथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पोनि/घस यांनी मला व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना देऊन व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. पोह/वाघ यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझे गळ्यात सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्रमांक-1 श्री. डोंगरे यांना श्री. बायस व श्री. दांडगे यांचेकडे विभागीय कार्यालय, म.रा.वि.वि.कं.मर्या. मस्तगड, जालना येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी केली असता, मी व पंच क्रमांक -1 श्री. डोंगरे असे माझेकडील मोटार सायकल MH21-AG-7754 ने विभागीय कार्यालय, म.रा.वि.क.मर्या मस्तगड, जालना येथे गेलो. त्याठिकाणी माझी श्री. बायस व श्री. दांडगे यांची भेट झाली. तेथील शिवनेरी हॉटेल मध्ये बसून आमचेत माझे कामासंबधी चर्चा झाली. चर्चेदरम्यान श्री. बायस यांनी माझ्याकडे 50000/-रुपयाची मागणी केली त्यावेळी मी त्यांना 50000/-रु. खुप जास्त होतात काही कमी करा असे सांगीतले परंतु श्री. बायस यांनी तुमच्यावर विजचोरीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी 50,000/- रूपये दयावेच लागतील असे सांगितले, त्यामुळे मी त्यांना 50,000/- रूपये आणून देतो असे म्हणालो असता त्यांनी त्यांना धारकल्याण, ता. जालना येथे तात्पुरते मीटर देण्यासाठी जायचे असल्याने त्यांनी मला सदरचे पैसे श्री. विष्णू दांडगे यांचेकडे देण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रमांक-1 श्री. डोंगरे असे शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी परत आल्यानंतर पोहवा वाघ यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतले. पोनि/घस, मी, पंच व सापळा पथकाने व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता, श्री. बायस व श्री. दांडगे यांनी माझ्याकडे हॉटेलला लाईटचे व्यावसाईक कोटेशन देवून विजचोरीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी 50000/-रु. लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.
त्यानुसार पोनि/घस यांनी मला व दोन्ही पंचांना लोकसेवक श्री. बायस व श्री. दांडगे यांचेविरुध्द लागलीच लाचेचा सापळा आयोजित करण्यात येणार असुन वेळेअभावी केलेल्या सर्व कारवाई बाबत एकत्रित पंचनामा करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पोनि/घस यांनी सापळा कारवाईसाठी अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लँम्पचा उपयोग होणार असल्याचे कळवुन त्याबाबत मला व पंचाना माहिती देऊन प्रात्यक्षिक करुन दाखवुन नियोजित सापळा कारवाईचे अनुषंगाने मला, पंच व सापळा पथकास सुचना दिल्या. पोनि/घस यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी लागणारे 50,000/-रु ज्यामध्ये 500/-रु दराच्या चलनी 50 नोटा घेऊन त्यांचे नंबर व वर्णन घेवून व खेळण्यातील 500/- रू. दराच्या 50 नोटा घेऊन त्यांचे वर्णन पंच क्रमांक-2 श्री. कांबळे यांचे करवी नमुद करून घेतले व त्यास अँथ्रासिन पावडर लावुन लाचेच्या नोटा माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवल्या. पोनि/घस यांनी मला श्री. बायस व श्री. दांडगे यांनी लाचेची मागणी केल्यास खिशात ठेवलेल्या लाचेच्या नोटा 50,000/-रु. काढुन श्री. बायस व श्री. दांडगे यांना द्याव्यात व त्यानंतर सापळा पथकास दिसेल अशा ठिकाणी येवुन खिश्यातील रुमाल डाव्या हाताने काढून डोक्याला बांधावा असा इशारा नेमुन दिला. कारवाई दरम्यान श्री. बायस व श्री. दांडगे हे त्यांना धारकल्याण, ता. जालना येथे तात्पुरते मीटर देण्यासाठी जायचे आहे असे सांगितलेने मी श्री. बायस यांना त्यांचा मोबा. क्र. 7875764194 यावर माझा मोबा. क्र. 9823591464 यावरून फोन करून कुठे येवू असे विचारले असता त्यांनी मला मस्तगड येथे येण्यास सांगितले.
त्यानंतर पोहवा/वाघ यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे गळ्यात सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करून मला व पंच क्रमांक-1 श्री. डोंगरे यांना लाचमागणी पडताळणी दरम्यान ठरल्याप्रमाणे 50000/-रु. लाच रक्कम श्री. बायस व श्री. दांडगे श्री. बायस व श्री. दांडगे यांना देण्यासाठी विभागीय कार्यालय, म.रा.वि.वि.क.मर्या, मस्तगडकडे रवाना केले. आमचे पाठोपाठ पोनि/घस सापळा पथकासह शासकीय वाहनाने येत होते. मी व पंच क्रमांक 1 डोंगरे असे माझेकडील मोटार सायकलने मस्तगड येथे मम्बादेवी मंदीराजवळ गेलो. तेथुन मी श्री. बायस यांना फोनवर स्पिकर ऑन करून बोलत्लो असता, श्री. बायस यांनी मला थांबा थोडं असे म्हणून फोन बंद केला. त्यानंतर श्री. विष्णू दांडगे यांनी त्यांचा मोबा. क्र. 8552000013 यावरून मला कॉल करून किती पैसे आणले असे विचारले असता मी

त्यान्ना 50,000/- रूपये आणले असे सांगितले असता त्यांनी मला MSEB कार्यालय, म.रा.वि.वि.क.मर्या, कन्हैय्यानगर येथे गेटवर जा, तेथे तुम्हाला भूषण नावाचा माणूस भेटेल, त्याला गेटवर पैसे देवून टाका असे सांगितलेने मी व पंच कन्हैय्यानगर ऑफीसकडे निघालो, आमचे पाठोपाठ पोनि घस व सापळा पथक येत होते. मी व पंच क्र. 1 श्री. डोंगरे असे MSEB कार्यालय, म.रा.वि.वि.क मर्या, कन्हैय्यानगर येथे गेलो. तेथे मी श्री. विष्णु दाडगे यास फोन केला असता त्यांने भूषणकडे दे, तो गेटवर आहे असे सांगितलेने मी आजूबाजूस पाहीले असता मला एका इसमाने हात दाखवल्याने मी त्याचेजवळ गेलो असता ती व्यक्ती मला त्यांचेकडील गाडीवर बसवून गेटजवळील चहाचे टपरीजवळ घेवून जात असताना मी हाताने इशारा करून पंच क्र. 1 श्री. डोंगरे याना तिथे बोलावले. तिथे गेल्यावर त्याने पैसे दे असे म्हणून पैशांची मागणी केली. त्यावेळी मी त्यास खिशातील 50,000/- रूपये उजवे हाताने काढून त्यांचे समोर धरले असता, त्यान्नी उजवे हाताने पैसे स्विकारले असता त्याचवेळी श्री. बायस यांचा त्यांना फोन आला, त्यांनी फोन माझ्याकडे दिला व पैसे मोजू लागले. मी श्री. बायस याना फोनवर स्पिकर ऑन करून पैसे दिले असे सांगितले असता त्यांनी मला ठिक आहे असे म्हणाले. त्यानतर मी लाच स्विकारल्यानंतर करावयाचा नेमुन दिलेला पुर्वनियोजीत इशारा 14.00 वा. केला. इशारा प्राप्त होताच पोनि/घस, सापळा पथकातील सदस्य व पंच क्रमाक 2 श्री. कांबळे हे तात्काळ घटनास्थळी हजर आले. पोहवा वाघ यानी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. पोनि/घस यांनी श्री. भूषण यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचाची व सापळा पथकातील सदस्याची ओळख करुन दिली. पोनि/घस यांनी पंच क्रमांक-1 श्री. डोंगरे याना पंच क्रमाक 2 श्री. कांबळे यांचे समक्ष विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्रमांक -1 श्री. डोंगरे यानी सांगितले की, " श्री. भूषन यांनी पैसे दे असे म्हणून उजवे हाताने 50,000/- रूपये स्विकारले आहेत." असा खुलासा पंच क्रमांक 1 श्री. डोंगरे यांनी केला. पोनि/घस यांनी श्री. भूषण यांना त्यांचे नाव विचारले असता, श्री. भूषण यांनी त्यांचे नाव श्री. भूषण अशोक वैलकर, वय 32 वर्षे, व्यवसाय लाईन हेल्पर, कंत्राटी, R-3 युनीट, ग्रामीण शाखा, सहाय्यक अभियंता कार्यालय, म.रा.वि.वि.क.मर्या, कन्हैय्यानगर, ता. जि. जालना, रा. गणेश रेसिडेन्सि, देवूळगावराजा रोड, सरोदे यांचे घरात किरायाने, जालना असे सांगीतले. पोनि/घस यांनी श्री. भूषण वैलकर यांना 50,000/-रु. लाच रक्मे बाबत विचारणा केली असता श्री. भूषण वेलकर यानी लाच रक्कम खुर्चीवर असल्याचे सांगीतले. पोनि/घस यांनी सदरची लाच रक्कम पंच क्रमाक 2 श्री. कांबळे याना त्यांचे ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगीतले असता, पंच क्रमाक 2 श्री. कांबळे यांनी लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या नोटांचे वर्णन व क्रमांक ततोतत मिळुन येत असल्याचे सांगीतले. पोनि/घस यांनी सदरच्या नोटा पंच क्रमाक 2 यांना ताब्यात ठेवण्यास सांगीतले. त्यानंतर पोनि/घस यांनी घटनास्थळावर प्राथमीक कारवाई केली. ......... सीसीटीएनएस प्रणालीमध्ये पुर्ण फिर्याद बसत नसल्याने उर्वरीत फिर्याद ही सीसीटीएन एस प्रत सोबत जोडलेली आहे.....

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

dipali dhondiba shinde(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb Impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
शरद बावने

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

प्रत मिळाली.

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे सदर बाजार जालना

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): dipali dhondiba shin
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

उर्वरीत फिर्याद खालील प्रमाणे.....

त्यानंतर पोनि/धरा, दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्व सदस्य ग्रामीण शाखा, सहाय्यक अभियंता
कार्यालय, म.रा.वि.वि.कं.मर्या, कन्हैय्यानगर, जालना येथे गेलो, त्याठिकाणी पोनि/धरा यांनी श्री.राजु बोबडे, उप
अभियंता, ग्रामीण शाखा, सहाय्यक अभियंता कार्यालय, म.रा.वि.वि.कं.मर्या, कन्हैय्यानगर, ता. जि. जालना, यांना
कारवाईबाबत माहिती देऊन त्यांचेकडुन श्री. बायस व श्री. विष्णू दांडगे यांची नावे घेतली असता त्यांनी त्यांची नावे
श्री. गणेशसिंग बबनसिंग बायस, कनिष्ठ अभियंता, मानदेवूळगाव सेक्शन, अति. कार्यभार ग्रामीण शाखा कार्यालय क.
3, म.रा.वि.वि.कं.मर्या, कन्हैय्यानगर, ता. जि. जालना व श्री. विष्णू धोंडीबा दांडगे, व्यवसाय लाईन हेल्पर, कंत्राटी,
ग्रामीण शाखा कार्यालय क. 3, म.रा.वि.वि.कं.मर्या , कन्हैय्यानगर, ता. जि. जालना असे सांगितले.

त्यानंतर पोनि/धरा यांनी पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे करण्यात येणार
असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी, पोनि/धरा, सापळा पथकातील सदस्य, दोन्ही पंच, श्री. भूषण वेलकर असे
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे हजर आलोत. त्याबाबत दिनांक 05/02/2024 रोजी लाचमागणी
पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा एकत्रीत सविस्तर पंचनामा केला आहे.

त्यानंतर पोनि/धरा यांनी मला घडलेले घटनेची सर्व हकिगत सविस्तर सांगुन त्याप्रमाणे फिर्याद द्यावी असे
सांगीतल्याने मी वरील प्रमाणे घडलेल्या घटनेबाबत पोनि/धरा यांचे समक्ष माझी फिर्याद कथन केली त्याप्रमाणे
टंकलिखीत करण्यात आलेली आहे.

त्यामुळे श्री. बायस व श्री. दांडगे यांनी माझ्याकडे हॉटेलला लाईटचे व्यावसाईक कोटेशन देवून विजचोरीचा
गुन्हा दाखल न करण्यासाठी 50000/-रु. लाचेची मागणी 50000/-रु. लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन त्यांचे
सांगणेवरून श्री. भूषण वेलकर यांनी ग्रामीण शाखा, सहाय्यक अभियंता कार्यालय, म.रा.वि.वि.कं.मर्या, कन्हैय्यानगर,
ता. जि. जालना चे समोर रोडवर चहाचे टपरीजवळ लाच रक्कम 50,

000/-रु. पंचासमक्ष स्विकारली असता, लोकसेवक श्री. भूषण वेलकर यांना लाचेच्या रकमेसह रंगेहात
पकडले आहे. म्हणुन माझी 1) श्री. गणेशसिंग बबनसिंग बायस, कनिष्ठ अभियंता, मानदेवूळगाव सेक्शन, अति.
कार्यभार ग्रामीण शाखा कार्यालय क. 3, म.रा.वि.वि.कं.मर्या , कन्हैय्यानगर, ता. जि. जालना (वर्ग-3), 2) श्री. विष्णू
धोंडीबा दांडगे, व्यवसाय लाईन हेल्पर, कंत्राटी, ग्रामीण शाखा कार्यालय क. 3, म.रा.वि.वि.कं.मर्या , कन्हैय्यानगर,
ता. जि. जालना, 3) श्री. भूषण अशोक वेलकर, वय 32 वर्षे, व्यवसाय लाईन हेल्पर, कंत्राटी, R-3 युनीट, ग्रामीण
शाखा, सहाय्यक अभियंता कार्यालय, म.रा.वि.वि.कं.मर्या, कन्हैय्यानगर, ता. जि. जालना, रा. गणेश रेसिडेन्सि,
देवूळगावराजा रोड, सरोदे यांचे घरात किरायाने, जालना यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

हि फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिलीबरोबर व खरी आहे.

समक्ष